।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4 th Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/१८७६/२०२६ दिनांक :२४/०६/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत असलेले सर्व महाविद्यालये / परिसंस्था---

विषय :- स्थलांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) देणेबाबत..
संदर्भ :- अध्यादेश क्र. ७४ ते ८१

महोदय/महोदया,

उपरोक्त नमूद विषयाच्या अनुषंगाने असे निदर्शनास येत आहे की, काही महाविद्यालये / परिसंस्था विद्यार्थ्यांना स्थलांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) मागणी करुन देखील देत नाही व अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडे पाठवून Online गुणपत्रिकेवर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांची स्वाक्षरी व शिक्का आणावा अशा सूचना करुन विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रत्यक्षपणे पाठवित आहेत, असे निदर्शनास आले आहे, यामुळे विद्यार्थ्यांना अडचणी निर्माण होत असून त्यांचे शैक्षणिक काम लवकर होत नाही, शिवाय त्यांना आर्थिक भूर्दंड देखील सहन करावा लागत आहे.

या संदर्भात आपणास सूचित करण्यात येते की,

१) महाविद्यालये/ परिसंस्थेकडे गुणपत्रक / निकालपत्रके विद्यापीठाकडून उपलब्ध करुन दिलेले नसल्यास, विद्यार्थ्यांने स्थलांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) मागणी केल्यास आपल्या महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये किंवा विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरील www.nmu.ac.in वर असलेल्या निकालाची खात्री करुन संबंधित अर्जदार विद्यार्थ्यांना सदर प्रमाणपत्र आपल्या स्तरावर देण्यात यावे.

२) महाविद्यालये / परिसंस्था यांना गुणपत्रके / निकालपत्रके प्राप्त झाल्यानंतर, सदर रेकॉर्ड तपासून विद्यार्थ्यांने स्थलांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) मागणी केल्यास आपल्याकडे असलेल्या दस्तऐवजांवरुन निकालाची खात्री करुन संबंधित अर्जदार विद्यार्थ्यांना सदर प्रमाणपत्र आपल्या स्तरावर देण्यात यावे.

उपरोक्त बाबतीत विद्यार्थ्यांना अडचणी येणार नाहीत, याबाबत काळजी घेण्यात येवून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,
सही/-
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ